राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१५ /प्र.क्र. २४/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ सप्टेंबर, २०२३

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(१) अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिकांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम यामध्ये जर एखाद्या नगरसेवकाने त्याच्या पदाचा वापर करून त्याने अथवा त्याच्या पती/पत्नी/अवलंबित व्यक्ती यांनी बेकायदा बांधकाम केले असेल अथवा बेकायदा बांधकामावर कारवाई करताना अडथळा निर्माण केला असेल तर अशा नगरसेवकास त्याच्या उर्वरित कालावधीकरिता अनर्ह ठरविण्याची तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, नगरसेवकाने अनधिकृत बांधकाम केले असल्यास ते जाहीर करण्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्याचे निर्देश द्यावेत अशी विनंती मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या PIL NO. ४५/२०२२ मध्ये करण्यात आली होती. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६/९/२०२३ रोजी दिलेल्या आदेशात निवडणूक लढविताना उमेदवाराकडून दाखल करण्यात येणाऱ्या शपथपत्रामध्ये त्याने / तिने अथवा पती / पत्नी अथवा अवलंबित व्यक्ती यांनी अनधिकृत बांधकाम केले आहे किंवा कसे याबाबतची माहिती उघड करता येणे शक्य आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० नुसार व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदीनुसार दोन प्रकारच्या अनर्हता नमूद करण्यात आल्या आहेत व त्यानुसार काही व्यक्ती पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास व काही व्यक्ती पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह होऊ शकतात.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१ड) / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१ड) अनुसार निवडून आलेल्या पालिका सदस्याला पालिका सदस्य म्हणून त्याचा पदावधी शिल्लक असेपर्यंत अनर्ह करण्याची तरतूद आहे, मात्र अशा व्यक्तीस पालिका सदस्य म्हणून पुढील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडून येण्यास अनर्ह करण्याची तरतूद सध्या नाही.

आणि ज्याअर्थी, जर एखाद्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबतच्या शपथपत्रात अनधिकृत बांधकामाबाबत चुकीची माहिती सादर केल्याचे निष्पन्न झाल्यास, त्या उमेदवारावर राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ११ ऑगस्ट, २००५ च्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्याबाबत तरतूद आहे, आणि तसे केल्यावर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांच्या कृतीवर आळा बसण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने दि. ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी महानगरपालिका निवडणुकांकरिता नामनिर्देशनपत्र व शपथपत्र यांचा नमुना विहित केला आहे आणि दि. १३ ऑगस्ट, २०१८ रोजी त्यासोबतच्या शपथपत्राचा नमुना सुधारीत केला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत द्यावयाच्या सदर शपथपत्रामध्ये सुधारणा करणे उपयुक्त ठरणार आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए (४) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या

कलम १४ (४) अन्वये मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का.५, दि. १३ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशातील मुद्दा क्र. १६ . ५ खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे :-

"१६.

५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १० / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही. मी स्वत: अथवा माझी पत्नी / माझे पती / माझे अवलंबित यांनी कोणतेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१ड) / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१ड) मधील तरतुदीनुसार जर मी निवडून आल्यावर अनधिकृत बांधकाम केले असल्याचे सिद्ध झाल्यास मी नगरसेवक पदावर रहाण्यास अनर्ह ठरेन, याची मला जाणीव आहे."

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( के. सूर्यकृष्णमूर्ती )
उपसचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत -

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
३) संगणकीकरण शाखा -

ऑनलाईन नामनिर्देशन प्रक्रियेच्या आज्ञावलीतील शपथपत्रामध्ये योग्य त्या सुधारणा करण्यासाठी अग्रेषित.